0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचावे :- १) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचेकडून दिनांक ०६/०७/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अहवाल व त्यासोबतची कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५५/२०१२/जा.५४६, दिनांक ०९/०८/२०१२, ३०/०८/२०१२ व १४/०९/२०१२.

३) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक २१/०८/२०१२ रोजी टपालामार्फत प्राप्त अभिवेदन.

४) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचे दिनांक ०३/१०/२०१२ रोजीचे अभिवेदन.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.५५/२०१२/जा. ८६२
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट, मुंबई - २०.
दिनांक : ०१ / १२/२०१२.

### आ दे श

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

**प्रकरणाची पार्श्वभूमी :-**

दिनांक २६/०७/२०१२ रोजी सकाळी ०५:०० वाजताचे दरम्यान बीपीटी येथे श्री. शिवकुमार आनंदकृष्णन, क्रमांक/०७७२४०८४० व श्री. नवीनकुमार तेजपाल सिंग, उपनिरिक्षक, सीआयएसएफ युनिट, मुंबई गस्ती कामी कर्तव्यावर असताना 'हे' बंदर, शिवडी, मुंबई या ठिकाणी एका टाटा कंपनीचे मॉडेल ७०७ (टरबो) टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ या टेम्पोमध्ये दोन इसम संशयास्पदरित्या तेलाने भरलेले ड्रम चढवित असल्याचे दिसून आले. वरील पोलिस अधिकाऱ्यांनी सदर इसमांना हटकुन काय करीत आहात, असे विचारले असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. म्हणून सदरहू दोन इसमांना ताब्यात घेऊन ते टेम्पोमध्ये चढवित असलेल्या ड्रममधील तेलाची पाहणी केली असता, सदर तेल जहाजामध्ये इंधन म्हणून वापरण्यात येत असलेले काळ्या रंगाच्या फर्नेस ऑईल सारखे वाटले. सदर इसमांकडे नमूद तेलाच्या संदर्भात कागदपत्रांची मागणी केली असता, त्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत. म्हणून सदर माल चोरीचा असल्याची खात्री पटल्याने नमूद इसमाकडे अधिक चौकशी केली असता, त्यांनी अशी माहिती दिली की, सदरचा माल अन्वर, सईद या दोन इसमांनी इतर दोन मजुराच्या मदतीने अरबी समुद्रातील बार्ज एरियामध्ये उभ्या असलेल्या एका परदेशी मालवाहु

0002 जहाजामधुन विनापरवाना घेऊन त्याच्या ताब्यातील दोन बोटीमध्ये भरुन 'हे' बंदर या ठिकाणी टेम्पोमध्ये भरुन पाठविण्याकरिता आणला आहे. वरील पोलिस अधिकारी गस्त करीत सदर ठिकाणी येत असल्याचे पाहून सदर टेम्पोचा चालक मोईन त्यांना पाहून पळून गेला. सदर टेम्पोवर "केजीएन" असे इंग्रजीमध्ये लिहीलेले आढळून आलेले असून टेम्पोची कागदपत्रे वर नमूद इसमाकडे मिळून आली नाहीत.

वरील मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ यामध्ये प्रत्येकी २०० लिटर अवैध काळे तेल भरलेले १५ लोखंडी ड्रम असल्याचे आढळून आले. तसेच मो/टेम्पोसह ताब्यात घेतलेल्या इसमांकडे त्यांची नांवे विचारली असता, त्यांनी त्यांची नांवे कासीम अहमद इसाक मोगल व योगेश ब्रीजभुषण यादव अशी असल्याची सांगितली. वर नमूद घटनेची माहिती वरील पोलिस अधिकाऱ्यांनी वरिष्ठांना दिल्यानंतर त्यांनी दिलेल्या आदेशानुसार पोलिस अधिकारी यांनी वरील इसम व त्यांचे ताब्यातील अवैध मालमत्ता याबाबत यलोगेट पोलिस ठाणेस माहिती देऊन नमूद इसमांना ताब्यात घेऊन त्यांचेसह यलोगेट पोलिस ठाणेस तक्रार नोंद करण्यास आले.

अशाप्रकारे इसम नामे कासीम अहमद इसाक मोगल, योगेश ब्रीजभुषण यादव यांनी तसेच पळून गेलेले इसम नामे मोईन, अन्वर व साईद या इसमांनी बार्ज एरियातील मालवाहू जहाजातून अंदाजे ३००० लिटर अवैध काळे तेल घेऊन त्यांची मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ यामधून बेकायदेशीर वाहतूक केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ तसेच २) भा. द. वि. चे कलम २८५ व ३४ चा भंग केल्यावरुन यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १८/२०१२, दिनांक २६/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन २०० लिटर क्षमतेच्या १५ लोखंडी ड्रममधील ३००० लिटर काळे तेल व मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ असे मिळून एकूण ३,६०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

प्रस्तुत गुन्ह्यातील अटक आरोपी कासीम अहमद मोगल यांनी दिनांक २७/०७/२०१२ रोजी पंचासमक्ष निवेदन दिले की, "दिनांक २६/०७/२०१२ रोजी रातको ०३.०० बजके टाईम मेरे साथमे बोट पे काम करणेवाला मेरा साथी उमर (पूरा नाम मालूम नही) मेझे घास बंद शिवडी इस जगह बोट लाके बोला. हम लोगोको समुद्रमे काम करणेको जानेका है. उमर ने बोलने के बाद मै उमर घास बंदर दारुखानासे छोटी बोट लेके समुद्र में काम करणेको निकले. उस टाईम और एक छोटी बोट हमारे साथ समुद्र में काम करणे के लिए निकली. उस बोट में और दो आदमी थे. उनका नाम मुझे मालूम नही. हम लोंक दो छोटी बोट लेके समुद्र बार्ज एरिया में गये. बार्ज एरिया में एक बार्ज खडी थी. उसका नाम मैने देखा नही. उस बार्जके पास जानेके पास उमर ने उस बार्जके लागोसे बात करणे के बाद उस बार्ज पर काम करणे वाले आदमी ने हमे काला तेल लेके जानेको कहा. फिर हमने उस बार्ज मे का काला तेल हमारी दो छोटी बोट में इंजन लगाकर भर दिया और वहा से बोट हे बंदर दारुखाना इस जगहा धक्के के

बाजूमे समुद्र मे लाकर खड़ी कर दिया. हे बंदर में मोईन टेम्पो चालक टेम्पो और खाली ड्रम लेके आया. उस टाईम हम लोग खाली ड्रम में काला तेल भरके टेम्पो मे भर रहे थे. उस टाईम सीआयएसएफ के ऑफिसर आये और हमसे हमारे पास मिले काले तेल के बारे में पुछताछ करने लगे. जिस छोटी बोट से काला तेल बार्ज एरियासे हम लोंग लेके आये थे. वह दो छोटी बोट हे बंदर, शिवडी, मुंबई इस जगह धक्केके बाजूसे लगाके रखी है. वह दो बोट में आपको दिखाता हू. आप मेरे साथ चलिए."

वरीलप्रमाणे आरोपीने निवेदन दिल्यानंतर अटक आरोपी, पोलिस व पंच पोलिस ठाणे दैनदिनीतून नोंद करुन पोलिस ठाणे समोरील जीपमध्ये बसले व पोलिस चालक यास आरोपी सांगेल त्याप्रमाणे जीप चालवावयास सांगितली. त्याप्रमाणे 'हे' बंदर धक्क्यालगत जीप गेली असता, आरोपीने जीप थांबविण्यास सांगितल्यावरुन पोलिसांनी जीप थांबविली. त्यानंतर आरोपी, पोलिस व पंच जीपमधून खाली उतरले व आरोपीने धक्क्यालगत उभ्या असणाऱ्या दोन छोट्या बोटीकडे अंगुली निर्देशन करुन वर नमूद गुन्ह्यात काळ्या तेलाची वाहतूक करण्यास वापरलेल्या दोन बोटी तिथे असल्याचे दाखविले. सदर दोन तेलवाहून नेणाऱ्या बोटी व एक प्लॉस्टिक पाईप असे मिळून एकूण ७०,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला व त्या दोन्ही बोटी टोचन करुन बोटगेट ह्या ठिकाणी लावण्यात आल्या आहेत.

त्यानंतर प्रस्तुत गुन्ह्यातील अटक आरोपी रियाज अहमद करीम खान यांनी दिनांक ३०/०७/२०१२ रोजी पंचासमक्ष निवेदन दिले की, "दिनांक २६/०७/२०१२ को रातको ०३.०० बजे मैने 'हे' बंदर, शिवडी, दारुखाना इस जगह पर मो[illegible] क्र. एमएच-०३-एन-६३६७ मे काले तेल क १२ ड्रम मोईन नाम के आदमी के कहनेपर लोड किया और इसके कहनेपर टेम्पो 'हे' बंदरसे लेके जाके जिस जगहपर पार्क किया व जगह और टेम्पो आपको दिखता हू, आप मेरे साथ चलिए."

वरीलप्रमाणे आरोपीने निवेदन दिल्यानंतर अटक आरोपी, पोलिस व पंच पोलिस ठाणे दैनदिनीतून नोंद करुन पोलिस ठाणे समोरील जीपमध्ये बसले व पोलिस चालक यास आरोपी सांगेल त्याप्रमाणे जीप चालवावयास सांगितली. सदर जीप सी.एस.टी. रोड पुढे जाऊन परत उजव्या बाजूस वळण घेऊन एअर इंडिया भिंतीलगत रोड, चुनाभट्टी नाका या ठिकाणी आली असता, आरोपीने जीप थांबवण्यास सांगितली. जीप थांबवून आरोपी, पोलिस व पंच खाली उतरले. त्यावेळी आरोपी चुनाभट्टी नाका येथे उभ्या केलेल्या टेम्पोच्या दिशेने चालत घेऊन गेला व एका टेम्पोला अंगुली निर्देशन करुन वर नमूद गुन्ह्यातील काळ्या तेलाने ड्रमने भरलेला टेम्पो असल्याचे दाखविले. आरोपीने दाखविलेला ड्रम भरलेला टेम्पो पोलिसांनी पंचासमक्ष लागलीच ताब्यात घेतला. सदर टेम्पो तपकिरी रंगाचा असून त्याचा नंबर ४०७ Ax., आरटीओ क्र. एमएच-०३-एन-६३६७ असा आहे. उजव्या बाजूस ४०७ Ax.-Turbo असे इंग्रजीत लिहिलेले दिसून आले. अधिक पाहणी केली असता, टेम्पोचा वरील भाग पत्र्याने पॅकबंद केलेली बॉडी असून त्यावर निळ्या रंगाच्या पट्टया दिसून येत आहे. पाठीमागील बाजूची पाहणी केली

असता, बॉडीचा अर्धवट भाग मोकळा दिसून आला. अर्धवट भाग उघडून पाहिला असता, लोखंडी पत्र्याचे शटर असून त्यास उघडून पाहिले असता, आतमध्ये प्रथम दर्शनी वेगवेगळ्या रंगाचे ३ लोखंडी ड्रम लाईनीत दिसून आले. तसेच आणखी आत डोकावून पाहिले असता, आणखी ३ वेगवेगळे लोखंडी ड्रम एका लाईनीत दिसून आले. सदर ड्रम व टेम्पो असे मिळून एकूण ३,३६,०००/- किंमतीचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले.

अशाप्रकारे नमूद गुन्ह्यात पोलिस पथकाने जप्त केलेल्या मुद्देमालाचे तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | २०० लिटर क्षमतेच्या १५ लोखंडी ड्रममधील काळे तेल | ३००० लिटर | ६०,०००/- |
| २ | मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ | १ नग | ३,००,०००/- |
| ३ | तेल वाहून नेणारी निळ्या व सफेद रंगाची बोट | १ नग | ४०,०००/- |
| ४ | तेल वाहून नेणारी निळ्या रंगाची बोट | १ नग | ३०,०००/- |
| ५ | एक २२ फुट प्लॉस्टिकचा पाईप | १ नग | ३००/- |
| ४ | मो/टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६३६७ | १ नग | ३,००,०००/- |
| ५ | १२ ड्रम काळे तेल | २४०० लिटर | ३६,०००/- |
| | | एकूण | ७,६६,३००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांनी केलेली असून, जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक २८/०८/२०१२ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक २८/०८/२०१२ रोजीच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी तसेच आरोपी/अपचारी यापैकी कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुढील सुनावणी दिनांक १२/०९/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १२/०९/२०१२ रोजीच्या सुनावणीस मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ चा मालक मोहम्मद सलीम शहाबुद्दीन खान यांनी उपस्थित राहून वाहनाचे परिवाहन विभागाचे नोंदणीकृत कागदपत्रांची छायांकित प्रत सादर केली. तथापी, त्यांनी लेखी निवेदन सादर केले नाही. सदरचे वाहन त्यांनी सईद नामे इसमास भाडेतत्त्वावर दिले असल्याचे सांगितले. सदर सुनावणीसही तपासी पोलिस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी यापैकी

कोणीही उपस्थित राहिले नाहीत. सबब, सर्व संबंधितांना त्यांचे म्हणणे सादर करण्याकरीता पुढील सुनावणी दिनांक ०३/१०/२०१२ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०३/१०/२०१२ रोजींच्या सुनावणीस तपासी पोलिस अधिकारी श्री. चिपकर यांनी उपस्थित राहून वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे यांचे वाचावे क्र. ४ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तथापी, इतर आरोपी/अपचारी यांना पुरेशी संधी देऊन देखील ते सदर सुनावणीसही उपस्थित राहिले नाहीत. तसेच तपासी पोलिस अधिकारी यांनी टेम्पो मालकांस नोटीस बजावण्यात आली व इतर आरोपी/अपचारी हे फरार असल्याचे सांगून त्यांना नोटीस बजावणी शक्य झाले नसल्याचे सांगितले.

सबब, सदरचे प्रकरण एकतर्फी निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

युक्तीवाद :-

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांनी दिनांक २१/०८/२०१२ रोजी टपालामार्फत सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, सदर गुन्ह्यात दोन मो/टेम्पोमध्ये काळे तेल अंदाजे एकूण ५,४०० लिटर तेल हे २७ लोखंडी ड्रममध्ये भरुन पोलिस ठाणेच्या आवारात ठेवण्यात आलेले असून सदर २७ लोखंडी ड्रम यांना कायदेशिर सील करण्यात आलेले आहेत व मो/टेम्पो, यलोगेट पोलिस ठाणेच्या अवारात सुरक्षित पोलिस पाहाऱ्यात ठेवण्यात आलेले आहेत. तसेच फायबरच्या दोन बोटी मॅलेट बंदर येथील बोट गेट जेट्टी येथे समुद्राच्या पाण्यात धक्क्याला दोरीच्या साह्याने बांधून सुरक्षित पोलिस पाहाऱ्यात ठेवण्यात आल्या आहेत. जप्त करण्यात आलेल्या संबंधित मुद्देमालाची निगराणी करण्याकरीता प्रत्येक दिवशी दिवसपाळी व रात्रपाळीकरीता प्रत्येकी तीन पोलिस अंमलदारांची नेमणूक करण्यात येते. सध्या पोलिस ठाणेस उपलब्ध असणारे मनुष्यबळ लक्षात घेता प्रत्येक दिवशी फक्त तीच मुद्देमाल सांभाळण्याकरिता वेगवेगळ्या सहा पोलिस अंमलदारांची नेमणूक करणे अशक्य होत आहे. कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मनुष्यबळाची मागणी वारंवार होत असल्याने पूर्ततेकामी बरेचशे मनुष्यबळ पोलिस ठाणेच्या बाहेर जात असल्याने सदर जप्त मुद्देमालाची देखरेखीकरता ठेवण्यात आलेल्या मनुष्यबळामुळे पोलिस ठाणे हद्दीमधल अत्यत महत्त्वाचे संवेदनशिल ठिकाणी अंमलदारांची पुर्तता करणे फारच जिकरीचे होत आहे. तसेच सदरच्या मुद्देमालाकडून एखादी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी वरील बाबींचा विचार करुन सदर प्रकरणामधील सर्व मुद्देमाल अथवा त्यामधील डिझेल साठा याची विल्हेवाट करण्याचे योग्य ते आदेश लवकरात लवकरत होण्यास विंनती आहे, असे नमूद केले आहे.

तसेच दिनांक ०३/१०/२०१२ रोजीच्या सुनावणीस उपस्थित यलोगेट पोलिस ठाणे येथील तपासी पोलिस अधिकारी श्री. चिपकर यांनी वरिष्ठ पोलिस निरिक्षक यांच्या सादर केलेल्या लेखी अभिवेदनात, यातील बोटीच्या मालकाने बोटीतील तेलाबद्दल कोणत्याही प्रकारचे कागदपत्र सादर केलेली नाहीत. तसेच बोटीबाबतही कागदपत्रे

0006 सादर केलेली नाहीत. वरील गुन्ह्यात तेलाचे नमुने जा.क्र. ४७३८/१२ अन्वये केमिकल अनॉलयाझर कालीना येथे पाठवि यात आले आहेत. त्यांचे रिपोर्ट अद्याप प्राप्त झालेले नाहीत. तसेच टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६३५७ यांची कागदपत्रे आहेत. तसेच टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ चे कागदपत्र अजुन प्राप्त झालेली नाहीत. सदर गुन्ह्यातील आरोपीतांना टेम्पो मालकाला नोटीसच्या बजावण्या केलेल्या आहेत. तसेच फरारी आरोपी मिळून न आल्याने त्याला नोटीस बजावता आलेली नाही. तरी सदर नोटीसची दखल घेऊन मुदेमाल लवकरात लवकर विल्हेवाटीचा आदेश होण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे.

निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तूत प्रकरणी, दिनांक २६/०७/२०१२ रोजी बीपीटी येथे गस्ती कामी कर्तव्यावर असताना 'हे' बंदर, शिवडी, मुंबई या ठिकाणी एका टाटा कंपनीचे मॉडेल ७०७ (टरबो) टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ या टेम्पोमध्ये दोन इसम संशयास्पदरित्या तेलाने भरलेले ड्रम चढवित असल्याचे दिसून आले. पोलिस अधिकाऱ्यांनी सदर इसमांना हटकले असता, त्यांनी उडवाउडवीची उत्तरे देण्यास सुरुवात केली. म्हणून सदरहू दोन इसमांना ताब्यात घेऊन ते टेम्पोमध्ये चढवित असलेल्या ड्रममधील तेलाची पाहणी केली असता, सदर तेल जहाजामध्ये इंधन म्हणून वापरण्यात येत असलेले काळ्या रंगाच्या ऑईल सारखे वाटले. सदर इसमांकडे नमूद तेलाच्या संदर्भात कागदपत्रांची मागणी केली असता, त्यांनी कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत. म्हणून सदर तेल चोरीचा असल्याची खात्री पटल्याने नमूद इसमाकडे अधिक चौकशी केली असता, त्यांनी अशी माहिती दिली की, सदरचा माल अन्वर, सईद या दोन इसमांनी इतर दोन मजुराच्या मदतीने अरबी समुद्रातील बार्ज एरियामध्ये उभ्या असलेल्या एका परदेशी मालवाहु जहाजामधुन विनापरवाना घेऊन त्याच्या ताब्यातील दोन बोटीमध्ये भरुन हे बंदर या ठिकाणी टेम्पोमध्ये भरुन पाठविण्याकरिता आणला आहे. वरील पोलिस अधिकारी गस्त करीत सदर ठिकाणी येत असल्याचे पाहून सदर टेम्पोचा चालक मोईन त्यांना पाहून पळून गेल्याचे सांगितले. अशाप्रकारे इसम नामे कासीम अहमद इसाक मोगल, योगेश ब्रीजभुषण यादव यांनी तसेच पळून गेलेले इसम नामे मोईन, अन्वर व सईद या इसमांनी बार्ज एरियातील मालवाहू जहाजातून अंदाजे ३००० लिटर अवैध काळे तेल घेऊन त्यांची मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ यामधून बेकायदेशीर वाहतूक केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द १) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३ व ७ तसेच २) भा. द. वि. चे कलम २८५ व ३४ चा भंग केल्यावरुन यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १८/२०१२, दिनांक २६/०७/२०१२ अन्वये गुन्हा नोंद करुन २०० लिटर क्षमतेच्या १५ लोखंडी ड्रममधील ३०००

लिटर काळे तेल व मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ असे मिळून एकूण ३,६०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले. प्रस्तुत गुन्ह्यातील अटक आरोपी कासीम अहमद मोगल यानी दिलेल्या माहितीनुसार 'हे' बंदर धक्क्यालगत उभ्या असणाऱ्या दोन छोट्या बोटीकडे अंगुली निर्देशन करुन वर नमूद गुन्ह्यात काळ्या तेलाची वाहतूक करण्यास वापरलेल्या दोन बोटी तिथे असल्याचे दाखविले. सदर दोन तेलवाहून नेणाऱ्या बोटी व एक प्लॉस्टिक पाईप असे मिळून एकूण ७०,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला व त्या दोन्ही बोटी टोचन करुन बोटगेट ह्या ठिकाणी लावण्यात आल्या आहेत. त्यानंतर प्रस्तुत गुन्ह्यातील अटक आरोपी रियाज अहमद करीम खान यांनी दिलेल्या माहितीनुसार, चुनाभट्टी नाका येथे उभ्या केलेल्या टेम्पोच्या दिशेने चालत घेऊन गेला व एका टेम्पोला अंगुली निर्देशन करुन वर नमूद गुन्ह्यातील काळ्या तेलाने ड्रमने भरलेला टेम्पो असल्याचे दाखविले. आरोपीने दाखविलेला ड्रम भरलेला टेम्पो पोलिसांनी पंचासमक्ष लागलीच ताब्यात घेतला. सदर टेम्पो तपकिरी रंगाचा असून त्याचा नंबर ४०७ Ax., आरटीओ क्र. एमएच-०३-एन-६३६७ असा आहे. अधिक पाहणी केली असता, आतमध्ये प्रथम दर्शनी वेगवेगळ्या रंगाचे ३ लोखंडी ड्रम लाईनीत दिसून आले. तसेच आणखी आत डोकावून पाहिले असता, आणखी ३ वेगवेगळे लोखंडी ड्रम एका लाईनीत दिसून आले. सदर ड्रम व टेम्पो असे मिळून एकूण ३,३६,०००/- किंमतीचा मुद्देमाल पंचांसमक्ष जप्त करण्यात आला. तसेच जप्त सांठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले. अशाप्रकारे नमूद गुन्ह्यात पोलिस पथकाने एकूण ७,६६,३००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांनी सादर केलेल्या अभिवेदनात, सदर गुन्ह्यात दोन मो/टेम्पोमध्ये काळे तेल अंदाजे एकूण ५,४०० लिटर तेल हे २७ लोखंडी ड्रममध्ये भरुन पोलिस ठाणेच्या आवारात ठेवण्यात आलेले असून फायबरच्या दोन बोटी मॅलेट बंदर येथील बोट गेट जेट्टी येथे समुद्राच्या पाण्यात धक्क्यावर दोरीच्या साह्याने बांधून ठेवण्यात आल्या आहेत. कायदा व सुव्यवस्था राखणेकामी मनुष्यबळाची मागणी वारंवार होत असल्याने पूर्ततेकामी बरेचशे मनुष्यबळ पोलिस ठाणेच्या बाहेर जात असल्याने सदर जप्त मुद्देमालाची देखरेखीकरता ठेवण्यात आलेल्या मनुष्यबळामुळे पोलिस ठाणे हद्दीमधल अत्यत महत्त्वाचे संवेदनशिल ठिकाणी अंमलदारांची पुर्तता करणे फारच जिकरीचे होत आहे. तसेच सदरच्या मुद्देमालाकडून एखादी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर प्रकरणामधील सर्व मुद्देमाल अथवा त्यामधील डिझेल साठा याची विल्हेवाट करण्याचे योग्य ते आदेश लवकरात लवकरत होण्यास विंनती केली. तसेच जप्त बोटीच्या मालकाने बोटीतील तेलाबद्दल व बोटीबाबतही कोणत्याही प्रकारचे कागदपत्र सादर केलेली नाहीत. तसेच कागदपत्रे सादर केलेली नाहीत. वरील गुन्ह्यात तेलाचे नमुने जा.क्र. ४७३८/१२ अन्वये केमिकल अॅनॅलयाझर कालीना येथे पाठविण्यात आले आहेत. त्यांचे रिपोर्ट अद्याप प्राप्त झालेले नाहीत. तसेच टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६३५७ यांची कागदपत्रे आहेत. तसेच टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ चे कागदपत्र अजुन प्राप्त झालेली नाहीत. सदर गुन्ह्यातील

0008
आरोपीतांना टेम्पो मालकाला नोटीसच्या बजावण्या केलेल्या आहेत. तसेच फरारी आरोपी मिळून न आल्याने त्याला नोटीस बजावता आलेली नाही. तरी सदर नोटीसची दखल घेऊन मुदेमाल लवकरात लवकर विल्हेवाटीचा आदेश होण्यास विनंती आहे, असे नमूद केले आहे.

प्रस्तूत प्रकरणी, मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ चा मालक मोहम्मद सलीम शहाबुद्दीन खान हे सुनावणीस उपस्थित राहिले व वाहनाचे परिवाहन विभागाचे नोंदणीकृत कागदपत्रांची छायांकित प्रत सादर केली. सदरचे वाहन त्यांनी सईद नामे इसमास भाडेतत्त्वावर दिले असल्याचे सांगितले. तथापी, त्यांनी लेखी निवेदन सादर केले नाही.

उपरोक्त गुन्ह्यामधील आरोपीतांनी संगणमत करुन जप्त काळेतेलचा साठा त्यांनी अरबी समुद्रातील बार्ज एरियामध्ये उभ्या असलेल्या एका परदेशी मालवाहु जहाजामधुन विनापरवाना घेऊन त्याच्या ताब्यातील दोन बोटीमध्ये भरुन 'हे' बंदर या ठिकाणी टेम्पोमध्ये भरुन पाठविण्याकरिता आणला असल्याचे घटनास्थळी दिलेल्या जबाबात कबूल केले आहे. सदर काळेतेलची आरोपीतांनी मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ व मो/टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६३६७ मध्ये बेकायदेशिर वाहतूक केल्याचे सिध्द होत आहे. नमूद गुन्ह्यातील आरोपीतांना त्यांचे लेखी अथवा मौखिक म्हणणे मांडण्यासाठी सुनावणीस पाचारण करुन व पुरेशी संधी देऊन देखील त्यांच्या पैकी कोणीही सुनावणीस उपस्थित राहिले नाहीत अथवा आवश्यक पुरावादर्शक दस्तऐवज सादर केले नाही. ही बाब अत्यंत गंभीर आहे. यावरुन आरोपी/अपचारी आणि जप्त मुद्देमालाचे मालक यांना याबाबत काहीही सांगावयाचे नसल्याचे आणि कोणताही खुलासा करावयाचा नसल्याचे तसेच जप्त मुद्देमाल परत मिळण्यासंदर्भात कोणतेही स्वारस्य नसल्याचे व नोटीसीतील आरोप मान्य असल्याचे दिसून येते. सबब, नमूद गुन्ह्यातील तस्करी मार्गाने प्राप्त केलेले २०० लिटर क्षमतेच्या १५ लोखंडी ड्रममधील ३००० लिटर व १२ ड्रममधील २४०० लिटर काळे तेल तसेच सदरच्या गैरमार्गाने प्राप्त केलेल्या विनापरवाना काळेतेलच्या साठयाची मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ व मो/टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६३६७ या दोन्ही टेंम्पोचा तसेच तेल वाहून नेणारी निळी/सफेद रंगाची बोट व तेल वाहून नेणारी निळ्या रंगाची बोट या दोन्ही बोटींचा वापर अवैध वाहतुकीसाठी केल्याचे निष्पन्न झाल्याने शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी धाडीच्या वेळी घटनास्थळी आढळून आलेल्या एक २२ फुट प्लॅस्टिकचा पाईप व रिकामे होणारे २७ लोखंडी ड्रम इ. शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १८/२०१२, दिनांक २६/०७/२०१२ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात खालील आदेश देत आहे.

RATIONING & ... HEAD OFFICE MUMBAI

6000

<u>आदेश</u> :-

१) जप्त करण्यात आलेले २०० लिटर क्षमतेच्या १५ लोखंडी ड्रममधील ३००० लिटर व १२ ड्रममधील २४०० लिटर काळे तेल यांचा साठा शासनजमा करण्यात यावा.

२) सदर साठ्याची पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

३) जप्त करण्यात आलेले मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ व मो/टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६३६७ हे शासनजमा करण्यात येत आहेत. सदर वाहनांच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास वाहनांचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरचे वाहने त्यांच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी वाहनांच्या मालकीबाबत परिवहन विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

४) अथवा वाहनांचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या वाहनांची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरचे वाहने लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

५) जप्त करण्यात आलेली तेल वाहून नेणारी एक निळ्या/सफेद रंगाची बोट व एक निळ्या रंगाची बोट या दोन्ही बोटी शासनजमा करण्यात येत आहेत. सदर बोटींच्या प्रत्येकी बाजारमुल्या एवढी संपुर्ण रक्कम भरण्यास बोटींचे मालक तयार असल्यास, तेवढी प्रत्येकी रक्कम भरल्यानंतर सदरच्या बोटी त्यांच्या मालकास परत करण्यात यावे व सदर रक्कम शासनजमा करावी. तथापी, अशी कार्यवाही करण्यापूर्वी बोटीच्या मालकीबाबत संबंधित विभागाच्या अभिलेखानुसार पोलीसांनी खातरजमा करावी.

६) अथवा बोटींचे मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या बोटींची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी. तथापी, सदरच्या बोटी लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

७) घटनास्थळी जप्त करण्यात आलेले एक २२ फुट प्लॅस्टिकचा पाईप, रिकामे होणारे २७ लोखंडी ड्रम इ. वस्तू शासनजमा करण्यात याव्यात. सदर वस्तूंची पोलिसांनी किरकोळीने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई (Financial Advisor & Dy. Secretary, Food,

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES

Civil Supply & Consumer Protection Dept., Govt. of Maharashtra, Mumbai) यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात "४४०८" या लेखाशिर्षात जमा करावी.

सही/-

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) अन्वर
२) सईद
३) मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ चा चालक मोईन
४) मो/टेम्पो क्र. एमएच-०४-सीपी-५२०८ चा मालक
५) कासीम अहमद इसाक मोगल
६) योगेश ब्रीजभुषण यादव
७) रफिक जिगन्या मुकादम
८) हेमत हुसेन अयुब शेख
९) मो/टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६३६७ चा चालक रियाज अहमद करीम खान
१०) मो/टेम्पो क्र. एमएच-०३-एन-६३६७ चा मालक
११) जितेंद्र रमेश यादव
१२) अन्वर मदार सय्यद
१३) उमर
१४) तेल वाहून नेणारी निळ्या व सफेद रंगाची बोटीचे मालक
१५) तेल वाहून नेणारी निळ्या रंगाची बोटीचे मालक

(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.
२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.
३) निवड नस्ती.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.